# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**सोमवार, दिनांक २९ मे, २०२३ / ज्येष्ठ ८, १९४५ (शके)**

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**६४.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ३८८ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी २८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती एकूण प्रलंबित ३६० निवेदनांपैकी १६२ निवेदने मा. सदस्यांना पत्रक भाग - २ अन्वये दिनांक सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ रोजी वितरीत करण्यात आली. आता एकूण १९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १९ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,<br>
मुंबई,<br>
दिनांक : **२९ मे, २०२३**

**जितेंद्र भोळे**<br>
सचिव-१ (कार्यभार),<br>
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन शाखा

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

# महाराष्ट्र विधानसभा लक्षवेधी सूचना क्र.१७१

**श्री. लहू कानडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"अनुसुचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून संयुक्तपणे भारत सरकार शिष्यवृत्ती देण्यात येत असणे, ही शिष्यवृत्ती महाडीबीटीच्या संकेतस्थळावरून शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असणे, शिष्यवृत्तीचे नवीन अर्ज भरण्यासाठी अनुसुचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वेळोवेळी मुदत वाढ देण्यात येणे, मात्र मात्र सन २०२२ / २३ च्या मध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध सवर्गाचे आतापर्यंत राज्यातून २ लाख ९० हजाराजचे ऑनलाईन नोंदणी झालेली असणे , त्यापैकी समाज कल्याण विभागाकडे प्राप्त झालेले १ लाख ४२००० अर्ज मंजूर करण्यात येणे मात्र १ लाख ते २० हजार अर्ज महाविद्यालयाकडे प्रलंबित असल्याची धक्कादायक बाब दिनांक १ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, विशेष म्हणजे समाज कल्याण विभागाने वारंवार याबाबत सूचना करूनही काही महाविद्यालयाने जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष केल्याचे समोर येणे, मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या महाविद्यालयांना संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडून नोटीस बजावून महाविद्यालयाचे मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात येणार असल्याचे सामाजिक न्याय विभागाचे विभागाचे सचिव आणि आयुक्त यांनी याबाबत आढावा घेतल्याचे समोर येणे, याबाबत शासनाने विद्यार्थ्यांच्या नुकसान करणाऱ्या महाविद्यालया विरोधात करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया".

---

## श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री, यांचे निवेदन

राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता मॅट्रीकोत्तर उच्च शिक्षण घेता येण्याकरीता राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांमार्फत विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यांत येतात. यामध्ये प्रामुख्याने केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना व राज्य शासनाची शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजनेचा समावेश आहे.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाच्या सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी (Mahadbt) पोर्टल दि. ०१.१०.२०१८ पासून नव्याने कार्यान्वीत झाले असून https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेत स्थळाचा वापर करून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या विविध योजनांकरिता विद्यार्थ्यांनी आपले ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत केले जातात. सदर अर्ज संबंधित महाविदयालयाकडून तपासून व पडताळणी करून संबंधीत जिल्हयातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग यांचेकडे मान्यतेस्तव सादर करण्यात येतात. महाविदयालयाकडून प्राप्त झालेल्या अर्जांवर संबंधीत जिल्हातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडून ऑनलाईन मान्यता देण्यात येते व त्यानंतर मान्यता झालेल्या अर्जांचे ऑनलाईन देयक तयार करुन ते कोषागारात सादर केले जाते. कोषागारातून सदर देयके मंजूर झाल्यानंतर मान्य झालेल्या अर्जांची शिष्यवृत्तीच्या रक्कमेची सत्र निहाय (First and Second Installment) PFMS प्रणालीद्वारे महाविद्यालय व विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक अदायगी करण्यात येते.

चालू शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन नोंदणीकृत करण्याकरीता राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर दि. २१ सप्टेंबर २०२२ पासून सुविधा